॥ सा विद्या या विमुक्तये ॥
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA
Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

**Fax : (02462) 215572** **Public Relations Office (PRO)** **website: srtmun.ac.in**
**Phone: (02462) 215325** **जनसंपर्क कार्यालय** **E-mail: pro@srtmun.ac.in**

संदर्भ क्र.: ज.का./२०२४-२५/१४७ दि.१८/०९/२०२४

# 'स्वारातीम' विद्यापीठामध्ये स्टार्ट अप आयडिया स्पर्धेचे पारितोषिक वितरण सोहळा संपन्न




स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठामध्ये 'स्टार्ट अप आयडिया' या स्पर्धेचे आयोजन दि. ५ सप्टेंबर रोजी करण्यात आले होते. या स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना दि. १२ सप्टेंबर रोजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर व नांदेड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी अभिजित राउत यांच्या हस्ते विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहामध्ये पारितोषिक वितरण करण्यात आले.

विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील संशोधक विद्यार्थी व पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी 'स्टार्ट अप आयडिया' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये एकूण २० स्टार्ट अप च्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रयोगाचे मॉडेल इत्यादीचे परीक्षण करून उत्कृष्ट स्पर्धकांची निवड करण्यात आली होती.

या स्पर्धेमध्ये भाग घेतलेल्या 'स्टार्ट अप आयडिया' च्या विद्यार्थ्यांपैकी लातूर येथील दयानंद फार्मसी कॉलेजचे विद्यार्थी शंकर मोरे व साईनाथ सूर्यवंशी यांना प्रथम व दयानंद सायन्स कॉलेजची विद्यार्थी जान्हवी अंबर यांना द्वितीय आणि शिरीष कानझडे यांना विशेष कनझोलेशन पारितोषिक देण्यात आले. या पारितोषिकाचे स्वरूप प्रत्येकी रु. २०,०००/- हजार रुपयाचे धनादेश व प्रमाणपत्र असे होते.

यावेळी जिल्हाधिकारी अभिजीत राऊत बोलताना म्हणाले की, स्टार्ट-अप च्या विद्यार्थ्यांनी संशोधन करताना पारितोषिकांचा विचार न करता आपल्या संशोधनाचा उपयोग समाजासाठी कशा पद्धतीने जास्तीत जास्त उपयोगी पडेल. यावर भर दिला पाहिजे. कुलगुरू डॉ. मनोहर चासकर म्हणाले की, विद्यार्थ्यांनी संशोधन करताना आपण जो मॉडेल तयार करतो तो कमीत कमी किमतीमध्ये उपलब्ध होईल यावर भर दिला पाहिजे.

या कार्यक्रमासाठी विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठता डॉ. एम. के. पाटील, औषधनिर्माणशास्त्र संकुलाचे संचालक डॉ. एस. जी. गट्टाणी, डॉ. पराग भालचंद्र, आयक्यूएसी चे संचालक डॉ. सुरेंद्रनाथ रेड्डी, श्री गुरुगोबिंदसिंघजी अभियांत्रिकी महाविद्यालयातील नवोपक्रम नवसंशोधन व साहचर्य विभागाच्या अधिष्ठाता डॉ. राजर्षी वाघमारे, सीए हर्षद शहा, सिए संजय जाजू यांची प्रमुख उपस्थिती होती कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शैलेश वाढेर यांनी केले तर आभार डॉ. शैलेश पटवेकर यांनी मानले.

---